जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 AUG 2017
तरुण भारत

# महिलांचा संरक्षण कायदा जागृतीसाठी आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठीच्या कायद्याच्या अंमलबजावणी व जागृती निर्माण होण्यासाठी १९ रोजी सकाळी ९.३० वाजता शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय स्तरावरील कार्यालयातील संबंधित समितीचे अध्यक्ष, सदस्य व कार्यालय प्रमुख यामध्ये सहभागी होतील. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर, विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, सदस्या विंदा किर्तीकर, आशा लांडगे, सदस्य सचिव मंजूषा मोळवणे, प्रकल्प अधिकारी मानकर उपस्थित राहणार आहेत.



**शिवाजी विद्यापीठात आयोजन, बालकल्याण संकुलात होणार जनसुनावणी**

राज्य महिला आयोगाच्या वतीने कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालयात महिलांच्या तक्रार निवारणासाठी अंतर्गत महिला तक्रार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. त्यादृष्टीने तक्रार समितीच्या कामकाज चालविण्यासाठीच्या कामकाज पद्धतीचे ज्ञान समितीने निष्पक्षपातीपणे काम कसे करावे, तक्रारीचे जलद निवारण कसे करावे, याबाबतची अंमलबजावणी कशी करावी तसेच समितीस तज्ज्ञामार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दरम्यान, महिलांना त्यांच्या तक्रारी स्थानिक स्तरावर मांडण्याकरीता 'महिला आयोग तुमच्या दारी' या उपक्रमाव्दारे १९ रोजी दुपारी २ वाजता बालकल्याण संकुल, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथे राज्य महिला आयोग यांची जनसुनावणी ठेवण्यात आली आहे.

या जनसुनावणीमध्ये तक्रारदार पिडीत महिलेला स्थानिक पातळीवर तत्काळ मदत व्हावी, त्या अनुषंगाने कोणतीही पिडीत महिला कोकणतीही पूर्व सूचना न देता थेट सुनावणीस उपस्थित राहून लेखी समस्या आयोगापुढे मांडू शकेल. या जनसुनावणीत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा, सदस्या व विधी सेवा प्राधिकरणाचे विधीतज्ज्ञ, वरिष्ठ पोलीस अधिकारी, संरक्षण अधिकारी, समुपदेशक उपस्थित राहून, तक्रारींचा निपटारा करणार आहेत. या जनसुनावणीस महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नितीन मस्के यांनी केले आहे.

19 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धा परीक्षेतील यशासाठी ध्येयवेडे व्हा

## तुषार जाधव; विद्यापीठातील सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या प्रशिक्षण वर्गाचा प्रारंभ

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**कोल्हापूर :** स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेतले पाहिजे. त्यासह ध्येयवेडेही झाले पाहिजे, असे प्रतिपादन जळगावचे सहायक गटविकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या सन २०१७-१८ कालावधीच्या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामधील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. जाधव म्हणाले, स्पर्धा परीक्षांबद्दल मनामध्ये असलेली भीती विद्यार्थ्यांनी काढून टाकावी. स्वत:चा आत्मविश्वास वाढवावा, कोणताही न्यूनगंड बाळगू नये. सखोल वाचन आणि त्यावरील मुद्दे यांची टिप्पण ठेवावी. अभ्यासक्रमांवर आधारित प्रश्नपत्रिकांचा सातत्याने अभ्यास करावा. दिवसातून कमीत कमी सहा तास अभ्यास करण्यासाठी काटेकोर नियोजन करावे. विद्यार्थ्यांनी स्वत:मधील कमतरता ओळखून पुढे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा, कणखरवृत्ती, हजरजबाबीवृत्ती जोपासली पाहिजे. प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. जाधव यांचे संपूर्ण कुटुंबीय समाजास प्रेरणा देणारे आहेत. आज, समाजामध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्पर्धा आहे. एमपीएससी आणि यूपीएससी या स्पर्धा परीक्षांमधील राजमार्ग आहेत. या स्पर्धेच्या जगात भक्कमपणे उभे राहायचे असेल, तर कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. यावेळी डॉ. जाधव यांच्या भगिनी दिप्ती, तृप्ती जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे उपस्थित होते.



कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात सहायक गटविकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी मार्गदर्शन केले.

### तुषार जाधव म्हणाले,

- ◆ स्पर्धा परीक्षांचे अर्ज काळजीपूर्वक भरा. त्यावर आधारित प्रश्न विचारले जाऊ शकतात.
- ◆ विद्यार्थ्यांनी सखोल वाचन, चिंतन, मनन यामध्ये सातत्य ठेवावे.
- ◆ विविध वर्तमानपत्रांमधील लेख वाचावेत.
- ◆ समाजकार्य करण्याची प्रचंड इच्छाशक्ती बाळगून तळागाळांतील लोकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्याची तळमळ असावी.
- ◆ एमपीएससीच्या दोन वर्षांचा प्रशिक्षण कालावधी आता यूपीएससीच्या धर्तीवर सुरु करणारे महाराष्ट्र राज्य हे एकमेव आहे.

19 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे नवसंशोधन करावे

## सुरेश देशपांडे यांचे आवाहन : शिवाजी विद्यापीठात मेडिकल डिव्हाईस हॅकेथॉनचा प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वैद्यकीय, अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील उपकरणांबाबत संयुक्तपणे नवसंशोधन करणे महत्त्वपूर्ण ठरणारे आहे, असे प्रतिपादन डॉ. सुरेश देशपांडे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग आणि आयआयटी मुंबईतील बायोमेडिकल इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी इनक्युबेशन सेंटरतर्फे (बी. टिक) मेडिकल डिव्हाईस हॅकेथॉन (मेधा) ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. तंत्रज्ञान विभागातील या कार्यक्रमास आयआयटी मुंबईचे डॉ. रूपेश ग्यार, प्रा. बी. रवी प्रमुख उपस्थित होते. डॉ. देशपांडे म्हणाले, देशातील औद्योगिक क्षेत्रासह वैद्यकीय विज्ञानामध्ये प्रगतीची गरज आहे. 'मेक इन इंडिया' संकल्पनेंतर्गत या 'बी.टिक' ची निर्मिती झाली आहे.



कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात मेडिकल डिव्हाईस हॅकेथॉन या स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी डॉ. सुरेश देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

देशात सध्या विविध आजारांवर उपचारांसाठी वापरण्यात येणारी नवतंत्रज्ञानावरील यंत्रसामग्रीच्या आयातीची टक्केवारी ८० टक्क्यांहून अधिक आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी आपल्या देशातच संबंधित यंत्रसामग्रीचे संशोधन व निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी 'मेधा' स्पर्धा आयोजित केली जात आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत असून यातून नवसंकल्पना पुढे येत आहेत. रूपेश ग्यार म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रात नवसंशोधनाला मोठी संधी आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापकांनी कार्यरत राहावे. वैद्यकीय क्षेत्राची गरज लक्षात घेऊन त्यांनी संशोधन करावे. विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रात नवनिर्मितीची संधी आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ, महाविद्यालयीन पातळीवर संशोधन व्हावे. या संशोधनाचा समाजासाठी उपयोग व्हावा. या कार्यक्रमात तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी वैद्यकीय क्षेत्राला असणारी अभियांत्रिकीची गरज याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. नरेंद्र देशपांडे, ए. बी. कोळेकर, एन. पी. राऊत, आदींसह विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी उपस्थित होते.

### अशी आहे 'मेधा' स्पर्धा

विद्यापीठात होणाऱ्या 'मेधा' स्पर्धा सुमारे ४० स्पर्धक सहभागी होतील. त्यांचे दहा संघ तयार करण्यात येणार आहेत. त्यातील एका संघात एक डॉक्टर आणि दोन अभियंते असतील. त्यांना वैद्यकीय क्षेत्रातील काही समस्या देण्यात येतील. या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी संशोधनातून उपकरण तयार करावयाचे आहे. त्यासाठी त्यांना अडीच दिवसांची मुदत असणार आहे. वर्धा, मुंबई, पुण्यानंतर आता कोल्हापुरात ही स्पर्धा होत आहे. यातून तीन विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार असल्याचे डॉ. देशपांडे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 AUG 2017
पुण्यनगरी

# ग्रंथालयासंदर्भात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** भारतीय ग्रंथशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त रविवार, दि. २० रोजी सकाळी १० वाजता न्यू कॉलेजमध्ये 'आधुनिक ग्रंथालये व त्यांच्यापुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठ माजी ग्रंथालय विभागप्रमुख एन. आय. दिवटणकर, डॉ. नमिता खोत, शालिनी लिहितकर हे यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील आज़ी-माजी ग्रंथपालांचा सत्कार करण्यात येणार आहे.